Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं/परीक्षा–३/३०३२
पुणे – ४११००४
दिनांक –२१/०८/२०२५

<u>महत्वाचे</u>

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र. १७) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत**

**संदर्भ:– या कार्यालयाचे क्र. रा.मं/परीक्षा–३/२६९८ दि. ३०/०७/२०२५ रोजीचे पत्र**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२वी) परीक्षा फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा कालावधी शुक्रवार दि. ०१/०८/२०२५ ते रविवार दि. ३१/०८/२०२५ पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

जे विद्यार्थी सदर मुदतीत नावनोंदणी करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा (मुदतवाढ) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | सोमवार दि. ०१/०९/२०२५ ते सोमवार दि. १५/०९/२०२५ |

१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी अर्ज करण्यासाठी <u>**http://www.mahahsscboard.in**</u> या वेबसाईटचा वापर करावा. सदर अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर सूचना वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

२ विभागीय मंडळांनी सदर नावनोंदणी अर्जांची छाननी करून नावनोंदणी प्रमाणपत्र Online पध्दतीने निर्गमित करावीत म्हणजे संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षेची आवेदनपत्रे भरणे सुलभ होईल.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ. पुणे–०४.

पत्र क्र. विमंअमरा/प्रमाण/1246
अमरावती दि.29/08/2025

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
अमरावती विभाग, अमरावती

उपरोक्त पत्राचे अवलोकन करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. व सदर बाब विद्यार्थी /पालक/शिक्षक व संबंधीत घटकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(डॉ. जयश्री राऊत)
विभागीय सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती